मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मतदार यादी अचूक करण्यासाठी विशेष पुनरीक्षणाला गती

## नागरिकांनी बीएलओंना सहकार्य करून विशेष सखोल पुनरीक्षणात सहभागी व्हावे : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी



**पिंपरी | प्रतिनिधी**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियानाची प्रभावी अंमलबजावणी आणि मतदार यादीतील माहिती अचूक व अद्ययावत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आढावा घेतला. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्यामार्फत सुरू असलेल्या घरोघरी भेटी, अर्ज संकलन, माहिती पडताळणी तसेच नागरिकांच्या प्रतिसादाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस पिंपरी चिंचवड महापालिका उप आयुक्त सचिन पवार, मतदार नोंदणी अधिकारी संदीप खोत, अर्चना यादव, सचिन पाटील आदी उपस्थित होते.

बैठकीत उप आयुक्त सचिन पवार यांनी विशेष सखोल पुनरीक्षण अभियानाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. बीएलओंकडून सुरू असलेल्या घरोघरी भेटी, अर्ज संकलन, प्रलंबित प्रकरणांची स्थिती तसेच मतदार नोंदणी प्रक्रियेतील विविध बाबींची माहिती त्यांनी दिली. निर्धारित कालमर्यादेत सर्व कामे पूर्ण करण्यासाठी विभागनिहाय नियोजन करून नियमित पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी विशेष सखोल पुनरीक्षण अभियानात कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रत्येक बीएलओने जबाबदारीने काम करावे, असे निर्देश दिले. मतदार यादीतील प्रत्येक नोंदीची काळजीपूर्वक पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर त्यांनी भर दिला.

बैठकीत बीएलओंच्या घरोघरी भेटींची प्रगती, अर्ज संकलन, प्रलंबित प्रकरणे तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या निकाली काढण्याबाबत चर्चा करण्यात आली. अभियानातील प्रत्येक टप्प्यावर नियमित आढावा घेऊन कामाची गुणवत्ता आणि गती कायम ठेवण्याच्या सूचनाही आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, "विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम हा मतदार यादी अधिक अचूक आणि अद्ययावत करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना आवश्यक माहिती व कागदपत्रे देऊन सहकार्य करावे. तसेच मतदार यादीतील नाव, पत्ता, छायाचित्र किंवा इतर कोणत्याही तपशीलात दुरुस्ती अथवा अद्ययावत माहिती आवश्यक असल्यास संबंधित मदत कक्षाशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूकपणे समाविष्ट होणे ही लोकशाही बळकट करण्यासाठी आवश्यक बाब आहे.

उप आयुक्त सचिन पवार यांनी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना विभागनिहाय समन्वय ठेवून विशेष सखोल पुनरीक्षण अभियानातील सर्व कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच मतदार यादी अधिक अचूक, त्रुटीमुक्त आणि अद्ययावत करण्यासाठी प्रत्येक अर्जाची वेळेत पडताळणी व निकाली काढण्यावर भर देण्याचे निर्देश दिले.

उप आयुक्त सचिन पवार म्हणाले, "विशेष सखोल पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी महापालिकेने विभागनिहाय नियोजन करून सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला आहे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी प्रत्येक घरापर्यंत पोहोचून मतदारांची माहिती अचूकपणे पडताळावी. नागरिकांनीही आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून सहकार्य करावे. प्रत्येक अर्जाची नियोजित कालमर्यादेत पडताळणी करून त्रुटीमुक्त आणि अद्ययावत मतदार यादी तयार करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी समन्वयाने काम करत आहेत.

> **“ पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील सर्व मतदारांना आवाहन करण्यात येते कि, दि. ३०/०६ / २०२६ पासून मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू झाले आहे. आपल्या नजीकच्या शाळेत आपण ज्या ठिकाणी मतदान करत आहात, तेथील बीएलओ यांना भेटून अथवा बीएलओ आपल्या घरी आल्यानंतर ईएफ फॉर्म भरून त्यास पोहच द्यावी. आपण ऑनलाईन ही फॉर्म भरू शकता त्यासाठी या lnk6.in/PCMCHO/e06c-QYOc संकेतस्थळावर जाऊन आपण माहिती भरू शकता. आपण Enumeration form २९/०७/२०२६ पूर्वी न भरल्यास आपले नाव प्रारूप यादीमध्ये येणार नाही कृपया नोंद घ्यावी.**
>
> **– विक्रांत बगाडे, अतिरिक्त आयुक्त**

# प्रत्येक प्रभागात कचरा वर्गीकरण केंद्र उभारणार; कचरा व्यवस्थापनाच्या विकेंद्रीकरणावर भर

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची भूमिका; मोशी दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीचीही घोषणा




**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील कचरा व्यवस्थापन ही एक गंभीर समस्या बनली असून, ती कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आता प्रत्येक प्रभागात कचरा वर्गीकरण केंद्र उभारून प्रभागनिहाय जबाबदारी निश्चित करावी, अशी भूमिका स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी महापालिकेच्या सभागृहात मांडली. या संदर्भात कुठलेही राजकारण न होता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्रित येवून पुढाकार घेत कचऱ्याची समस्या मार्गी लावावी, असेही त्यांनी नमूद केले.

शहरातील कचरा समस्या मुळापासून संपवण्यासाठी महापालिकेने आता विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारले पाहिजे. याबद्दल अधिक माहिती देताना अभिषेक बारणे यांनी सांगितले की, शहराचा कचरा प्रश्न सुटण्यासाठी प्रत्येक प्रभागाची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. या नव्या नियोजनानुसार, प्रत्येक प्रभागामध्ये कचरा विलगीकरण आणि वर्गीकरणाचे स्वतंत्र केंद्र कार्यान्वित केले जावे. यामुळे ओल्या आणि सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्यापासून खतनिर्मिती किंवा पुनर्वापर करणे सोपे होईल. हे काम प्रत्यक्ष जमिनीवर अंमलात यावे, यासाठी संबंधित एजन्सी आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

कचरा व्यवस्थापनासोबतच, मोशी येथील कचरा डेपो येथे नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याचा निर्णयही सभापती बारणे यांनी जाहीर केला. यात मृत व्यक्तींच्या प्रत्येक वारसाला महापालिकेच्या वतीने १० लाख रुपये, तर संबंधित संस्थांकडून २५ लाख रुपयांची आणि शासनाकडून ५ लाखाची आर्थिक मदत दिली जाणार आहे. याव्यतिरिक्त, जखमींच्या उपचारासाठी आणि त्यांच्या वैद्यकीय गरजांसाठी महापालिका सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट करून ही प्रक्रिया त्वरित राबवावी, असे त्यांनी सांगितले.

# ‘SIR’ अन् संघटनात्मक कामगिरी ठरणार निर्णायक..!

## प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्यांसाठी भाजपाचे “निकष”; भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील प्रभाग समित्यांवरील स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीसाठी भारतीय जनता पक्षाने स्पष्ट निकष जाहीर केले असून, ‘स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन’ (SIR) मोहिमेतील कामगिरी आणि पक्षासाठी केलेले संघटनात्मक योगदान हेच निर्णायक ठरणार असल्याचे भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या विविध प्रभाग समित्यांवर एकूण ३० स्वीकृत सदस्यांची नियुक्ती दि.२७ ते ३० जुलै २०२६ या कालावधीत होण्याची शक्यता असून, त्यासाठी पक्षांतर्गत प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

यासंदर्भात शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी सांगितले की, प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य म्हणून काम करण्यास इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांनी दि.१८ जुलै २०२६ रोजी भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात लिखित अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जामध्ये पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, प्रभाग क्रमांक, पक्षातील कार्याचा कालावधी, शैक्षणिक पात्रता, संपूर्ण रहिवासी पत्ता आदी माहिती नमूद करणे बंधनकारक राहणार आहे.



विशेष म्हणजे, इच्छुक कार्यकर्त्यांनी दि. २५ जुलै २०२६ पर्यंत आपल्या प्रभागातील किमान १५ बूथवर ८० टक्क्यांपेक्षा अधिक SIR मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करणे अनिवार्य केले आहे. तसेच, संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा सरचिटणीसांकडून ‘TASK LETTER COMPLETION’ प्राप्त करून ते विहित मुदतीत पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात जमा करणे बंधनकारक असेल.

चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी भाजपा संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, भोसरीसाठी विकास डोळस आणि पिंपरीसाठी वैशाली खाडये यांच्याकडून जारी केलेले ‘TASK LETTER COMPLETION’च ग्राह्य धरण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाच्या संघटनात्मक विस्तारासाठी कार्यरत असलेल्या पदाधिकारी, बूथप्रमुख आणि सक्रिय कार्यकर्त्यांना आगामी काळात मोठी संधी मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याने, शहरातील राजकीय वर्तुळात या नियुक्त्यांबाबत उत्सुकता वाढली आहे.

याबाबत शत्रुघ्न काटे म्हणाले की, “भाजपा हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या आणि संघटन मजबूत करण्यासाठी योगदान देणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याची दखल घेतली जाते. निर्धारित मुदतीत SIR मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण करून संबंधित सरचिटणीसांचे ‘ऑफिशियल टास्क कन्फर्मेशन लेटर’ सादर करणाऱ्या इच्छुक कार्यकर्त्यांच्याच नावाची शिफारस मी, शहराध्यक्ष या नात्याने, भाजपच्या कोअर कमिटीकडे प्रभाग समितीवरील स्वीकृत सदस्य म्हणून करणार आहे.” निर्धारित निकषांनुसार SIR मोहीम पूर्ण न करणाऱ्या किंवा आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर न करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराच्या नावाची शिफारस करण्यात येणार नाही. त्यामुळे स्वीकृत सदस्यपदासाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांनी ही प्रक्रिया गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

### अतिवृष्टीमुळे SIR मोहिमेला मुदतवाढ..

» अतिवृष्टीमुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने ‘स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन’ (SIR) प्रक्रियेला १० दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार, गृहभेटींची प्रक्रिया आता दि. ८ ऑगस्ट २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. मतदार यादीचे प्रारूप दि. १७ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणार असून, दावा-हरकती स्वीकारण्याचा कालावधी १७ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर असा असेल. दावा-हरकतींची छाननी १६ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान होणार असून, अंतिम मतदार यादी दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील दोन महिने बूथस्तरावरील कार्यकर्त्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत.

“ पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील सर्व मतदारांना आवाहन करण्यात येते कि, दि. ३०/०६ / २०२६ पासून मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण सुरू झाले आहे. आपल्या नजीकच्या शाळेत आपण ज्या ठिकाणी मतदान करत आहात, तेथील बीएलओ यांना भेटून अथवा बीएलओ आपल्या घरी आल्यानंतर ईएफ फॉर्म भरून त्यास पोहच द्यावी. आपण ऑनलाईन ही फॉर्म भरू शकता त्यासाठी या lnk6.in/PCMCHO/e06c-QYOc संकेतस्थळावर जाऊन आपण माहिती भरू शकता. आपण Enumeration form २९/०७/२०२६ पूर्वी न भरल्यास आपले नाव प्रारूप यादीमध्ये येणार नाही कृपया नोंद घ्यावी.

– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पवना धरण 77 टक्के भरले, तरी पिंपरी-चिंचवडकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार!

## पूर आला, धरण साठा वाढला; मात्र जलसंपदा विभागाच्या सूचनेनुसार 15 टक्के पाणी कपात कायम, ऑक्टोबरपर्यंत निर्णय नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात गेल्या आठवड्यात जोरदार पाऊस होऊन पवना आणि इंद्रायणी नदीस पूर आला होता. तसेच, पवना धरण 77 टक्के भरले आहे. असे असतानाही शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात यापुढेही सुरूच राहणार असल्याने प्रशासनाने जाहीर केले आहे.

जून महिना संपला तरी, पावसाळा सुरू न झाल्याने तसेच, शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात केवळ 16 टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने 15 टक्के पाणी कपात सुरू केली होती.



ती कपात शहरात 19 जूनपासून सुरू करण्यात आली होती. त्यामुळे शहरात नेहमीपेक्षा अर्धा ते एक तासाने पाणी कमी सोडण्यात येत आहे. त्यामुळे शहरातील अनेक भागांत पाणीटंचाईचा सामना करावा लागला.

मात्र, जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावली. पाच व सहा जुलैला झालेल्या धुवाधार पावसामुळे पवना आणि इंद्रायणी नदीस पूर येऊन अनेकांच्या घरात तसेच, हाऊसिंग सोसायट्यांत पाणी शिरले. पवना धरणात अल्पावधीतच तब्बल 77.28 टक्के भरले आहे. त्यामुळे पाणी कपात रद्द होईल, अशी शहरवासीयांना आशा होती. मात्र, एल निनोचा प्रभाव कमी झाला नसून, पाण्याचे आतापासूनच नियोजन करून काटकसरीने पाण्याचा वापर करण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेस केली आहे. तसेच, पाणी कपात कायम ठेवण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे महापालिकेने पाणी कपात मागे घेतलेली नाही.

### तर पाणी कपात रद्द होईल

» पिंपरी-चिंचवड शहरात सुरू असलेली 15 टक्के पाणी कपात कायम ठेवण्यात येणार आहे. ऑक्टोबरपर्यंत धरणात शंभर टक्के पाणीसाठा असल्यानंतरच ती कपात रद्द केली जाईल. अन्यथा कपात पुढेही कायम ठेवण्यात येणार आहे. सध्या पाणी कपात असली तरी, नागरिकांच्या तक्रारींचे प्रमाण बरेच कमी झाले आहे, असे महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# महापालिकेच्या वैद्यकीय योजनेचा विस्तार

## आजी-माजी नगरसेवकांनंतर कुटुंबीयांसह नवीन लाभार्थी समाविष्ट करण्याची मागणी; सामान्य नागरिकांसाठी मर्यादित मदत

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसेवेची आस असणाऱ्या महापालिकेतील माननियांना आपल्या आणि कुटुंबियांनाच्या आरोग्याची भलतीच काळजी असते. यामुळे एकदा पालिका गाठली की आरोग्याची काळजी त्वरीत घेतली जाते तीही पालिकेच्या म्हणजेच करदात्यांच्या पैशांतून. यातूनची पालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेची व्याप्ती सतत वाढत आहे. या योजनेत आजी-माजी नगरसेवक, पीएमपी,

शिक्षण मंडळाच्या माजी पदाधिकाऱ्यांचा समावेश धीच झाला आहे. त्यात वृक्ष प्राधिकरणातील माजी अशासकीय सदस्य, कुटुंबियांनाही ही सुविधा देण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आला आहे. एकीकडे शहरातील सामान्यांना खासगी रुग्णालयांचे दर परवडत नाहीत. पालिकेने कोट्यवधी खर्चूनही आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला आहे.

शहर विकासासाठी हातभार लावून प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या नागरिकांना वैद्यकीय सेवा मिळणे अवघड झाले असताना नगरसेवक, राजकीय कार्यकर्त्यांसाठी पालिकेची तिजोरी रिकामी केली जात आहे त्यामुळे पालिकेच्या निधीचा वापर नेमका कोणासाठी केला जात आहे, असा प्रश्न आहे.

महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा केवळ १ लाख ६० हजार रुपये आहे. त्यांनाही उपचारासाठी जास्तीत जास्त दोन लाख रुपयांचीच मदत मिळते. दुसरीकडे आजी-माजी नगरसेवक, योजनेत समाविष्ट केलेल्या इतर पदाधिकाऱ्यांच्या उपचार खर्चावर कोणतीही मर्यादा नाही.

वर्षाला केवळ १,२०० रुपये अंशदान भरून खासगी रुग्णालयांमध्ये लाखो रुपयांचे उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. स्थायी समितीसमोर दाखल झालेल्या नव्या प्रस्तावानुसार, वृक्ष प्राधिकरणाच्या माजी अशासकीय सदस्यांसह त्यांच्या पती-पत्नी, अवलंबित अपत्ये आणि कुटुंबीयांना पालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अत्यावश्यक वैद्यकीय सहाय्य योजनेचा कायमस्वरूपी लाभ देण्याची मागणी केली आहे.

वृक्ष प्राधिकरणातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती बहुतांश वेळा राजकीय शिफारशीवर किंवा राजकीय पुनर्वसनाचा भाग म्हणून होत असते. त्यावर टीकाही सातत्याने होत आली आहे. आता अशा नियुक्त्यांनाही पालिकेच्या खर्चातून अमर्याद वैद्यकीय लाभ देण्याचा प्रयत्न होत असल्याने त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.




### सामान्य नागरिकांसाठी वेगळे निकष

» महापालिकेच्या अत्यावश्यक वैद्यकीय सहाय्य योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा केवळ १.६० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. त्यांनाही उपचारासाठी जास्तीत जास्त दोन लाख रुपयांचीच आर्थिक मदत मिळते. दुसरीकडे आजी-माजी नगरसेवक आणि इतर समाविष्ट पदाधिकाऱ्यांना वर्षाला केवळ १,२०० रुपये अंशदान भरून खासगी रुग्णालयांत लाखो रुपयांचे उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे या दोन निकषांतील तफावत चर्चेचा विषय ठरत आहे.

### योजनेची व्याप्ती वाढणार?

» महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेत आजी-माजी नगरसेवक, पीएमपी आणि शिक्षण मंडळाच्या माजी पदाधिकाऱ्यांनंतर आता वृक्ष प्राधिकरणातील माजी अशासकीय सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांचाही समावेश करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर आला आहे. प्रस्तावानुसार पती-पत्नी, अवलंबित अपत्ये आणि कुटुंबीयांनाही कायमस्वरूपी वैद्यकीय लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे या योजनेची व्याप्ती आणखी वाढणार असून, पालिकेच्या आर्थिक भारातही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### प्रस्तावावर लक्ष

» महापालिकेची आर्थिक स्थिती, विकासकामांसाठी निधीची कमतरता आणि सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची गरज या पार्श्वभूमीवर या प्रस्तावाकडे लक्ष लागले आहे. वृक्ष प्राधिकरणातील अशासकीय सदस्यांची नियुक्ती बहुतेकदा राजकीय शिफारशीवर होत असल्याची टीका होत असताना त्यांनाही अमर्याद वैद्यकीय लाभ देण्याच्या प्रस्तावामुळे प्रश्न उपस्थित होत आहेत. आता या प्रस्तावावर स्थायी समिती आणि महापालिका प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वारीत आरोग्य विभागाचा मोठा रेकॉर्ड! 3 लाखांहून अधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

## 3 लाख 15 हजार वारकऱ्यांना ओपीडी सेवा; ताप, उच्च रक्तदाब आणि श्वसनविकाराच्या हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार.

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने उभारलेली आरोग्य यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत असून, १५ जुलैपर्यंत तब्बल ३ लाख १५ हजार २१ वारकऱ्यांना बाह्यरुग्ण (ओपीडी) सेवा देण्यात आली आहे. याशिवाय २ हजार ७६१ रुग्णांवर दाखल करून उपचार करण्यात आले असून, ६२० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे.

'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून सार्वजनिक आरोग्य विभागाने पालखी मार्गावरील प्रत्येक वारकऱ्यापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे नियोजन यशस्वीपणे राबविले आहे. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका, आयसीयू सुविधा, बाईक ॲम्बुलन्स, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' केंद्रे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून भाविकांना तात्काळ उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत.

वारीदरम्यान ताप, श्वसनविकार, अतिसार, उच्च रक्तदाब, मधुमेह यांसारख्या विविध आरोग्य समस्यांवर त्वरित उपचार करण्यात येत आहेत. १५ जुलैपर्यंत १९ हजार ३६ तापाच्या रुग्णांवर, ११ हजार ३०४ श्वसन संसर्गाच्या रुग्णांवर, ६ हजार २४५ उच्च रक्तदाब, ५ हजार ४६९ मधुमेह तसेच ९ हजार ९७७ अतिसाराच्या रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत. वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तसेच ३०२ तज्ज्ञ डॉक्टर अहोरात्र कार्यरत आहेत.



### प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा

» यंदाच्या आषाढी वारीत प्रथमच गंभीर रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्स सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच 'आरोग्यसंपन्न वारी' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, रुग्णवाहिका, उपचार सुविधा आणि आपत्कालीन सेवांची माहिती वारकऱ्यांना सहज उपलब्ध होत आहे. रस्ते अपघात, हृदयविकार आणि इतर गंभीर रुग्णांना तातडीने वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून, पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण आणि कीटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी विशेष उपाययोजनाही राबविण्यात आल्या आहेत.

# पुणे जिल्ह्यातील श्रावणी कुदळे देशात पाचवी, राज्यात पहिली!

## नीट-यूजी फेरपरीक्षेचा निकालात पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील श्रावणी कृष्णा कुदळे या विद्यार्थिनीने दमदार कामगिरी केली.

**पुणे | प्रतिनिधी**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षप्रवेशांसाठी राष्ट्रीय चाचणी संचलन संस्थेतर्फे (एनटीए) घेण्यात आलेल्या नीट-यूजी फेरपरीक्षेचा निकालात पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील श्रावणी कृष्णा कुदळे या विद्यार्थिनीने दमदार कामगिरी केली. श्रावणीने देशात पाचवा, मुलींमध्ये देशांत पहिला आणि राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे. श्रावणीला ७२० पैकी ७१० गुण मिळाले आहेत. पेपरफुटीमुळे खचून न जाता मिळालेल्या अतिरिक्त वेळेचा तिने अभ्यासासाठी वापर करून यश मिळवले.

एनटीएतर्फे मेमध्ये घेण्यात आलेली परीक्षा पेपरफटीमुळे रद्द करावी लागली. त्यानंतर २१ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात आली. देशभरातील ५५१ शहरातील ५४४० परीक्षा केंद्रांवर १३ भाषांमध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर करण्यात आला. सुमारे २० लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या या परीक्षेतून ११.२१ लाख विद्यार्थी विविध वैद्कीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकी ५८ टक्क्यांहून अधिक मुली आहेत.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील खडकी या गावच्या श्रावणी कुदळे या विद्यार्थिनीने मिळवलेल्या यशामुळे छोट्या गावांमध्येही असलेली गुणवत्ता अधोरेखित झाली आहे. श्रावणीचे वडील कृष्णा कुदळे आणि आई जयश्री कुदळे दोघेही जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. श्रावणीचेही प्राथमिक शिक्षण दौंड तालुक्यातील गोपाळवाडी चोरमले वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण माळेगाव येथील शारदाबाई पवार विद्यानिकेतनमध्ये, तर अकरावी-बारावीचे शिक्षण लडकत स्कूलमध्ये झाले. तिने नीटच्या तयारीसाठी खासगी शिकवणीही लावली होती. पेपरफुटीमुळे खचून न जाता सातत्याने अभ्यास करून श्रावणीने या परीक्षेत राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले.



### छोट्या गावातून राष्ट्रीय यश

» दौंड तालुक्यातील खडकी गावातील श्रावणी कृष्णा कुदळे हिने नीट-यूजी २०२६ परीक्षेत देशात पाचवा, मुलींमध्ये देशात पहिला आणि महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तिला ७२० पैकी ७१० गुण मिळाले. छोट्या गावातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी गुणवत्ता असून योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर यश मिळवता येते, हे श्रावणीने सिद्ध केले आहे. तिच्या यशामुळे दौंड तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### राज्यातील गुणवंत

» नीट परीक्षेत ६८०पेक्षा अधिक गुण मिळवलेले देशभरातील १३८ विद्यार्थी आहेत. त्यात देशात पाचवी आणि राज्यात पहिली आलेल्या श्रावणी कदळेसह आणखी काही विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. मोहनसिंह भोसले याने १०वा, सार्थक पाटीलने १४वा, सान्निध्य डोंगरेने २८वा, अर्णव लाहोटीने ३२वा, प्रणव टेंभुर्णेने ३३वा, रौश्मित गुप्ताने ३४वा, सोहम पाटीलने ५३वा, सागर कारीकरने ६७वा, सौम्या बडोलेने ७७वा, अनुश्री थोरातने ८५वा, आर्या दिवेकरने ९०वा, सहीम पटवेगारने १०६, सुहान शेखने ११६वा, अमीर वारावालाने ११९वा, सार्थक पेठकरने १२०, श्रीवल्लभ गावडेने १२२वा, तर गोपाळ पाटीलने १३७वा क्रमांक मिळवला आहे.

> “ नीटच्या तयारीसाठी खासगी शिकवणी लावली होती. दिवसभरात किमान सहा तास स्वयंअध्ययन करत होते. प्रामुख्याने संकल्पना समजून घेण्यावर भर दिला होता. पेपरफुटीमुळे सुरुवातीला वाईट वाटले. पण त्याकडे संधी म्हणून पाहायचे ठरवले. मिळालेल्या अतिरिक्त वेळेचा सदुपयोग करून अधिक नेटाने अभ्यास केला. सातत्यपूर्ण अभ्यास आणि निश्चित ध्येय ठेवून प्रयत्न केल्यास यश मिळवता येते. ”
>
> - श्रावणी कुदळे, नीट परीक्षेत देशात पाचवी, मुलींमध्ये आणि राज्यात पहिली .

# खडकवासला धरणसाखळीत पाणीसाठा 58 टक्क्यांवर; पुणेकरांसाठी पाणीपुरवठ्याचा दिलासा

## पावसाचा लपंडाव कायम; धरणसाखळीत केवळ 0.07 टीएमसी वाढ, मुठा कालव्यातील विसर्ग वाढवून 1,005 क्युसेक

**पुणे | प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या घाटमाथ्यासह पानशेत, मोसे, मुठा खोऱ्यात शुक्रवारी (दि. १७) दिवसभर पावसाचा लपंडाव सुरू राहिल्याने खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठ्यात केवळ ०.०७ टीएमसीची वाढ झाली. सायंकाळी ५ वाजेपर्यंत खडकवासला धरण साखळीत १६.९४ टीएमसी, म्हणजेच ५८.१३ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला.

धरणसाखळीच्या लाभक्षेत्रातील हवेली, दौंड आणि इंदापूर तालुक्यातील १५ लाखांहून अधिक नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन खडकवासला धरणातून मुठा कालव्यात सोडण्यात येणारा विसर्ग वाढवून १,००५ क्युसेक करण्यात आला आहे.

१ जुलैपासून ५७ टक्क्यांवर स्थिर असलेला खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठा अखेर शुक्रवारी ५८.१३ टक्क्यांवर पोहोचला. घाटमाथा आणि पानशेत-मोसे-मुठा खोऱ्यात रिमझिम पाऊस व अधूनमधून उघडीप असल्याने नद्या, ओढे आणि नाल्यांतून धरणांकडे पाण्याची आवक मंदगतीने सुरू आहे.

शुक्रवारी दिवसभरात टेमघर येथे २३ मि.मी., पानशेत व वरसगाव येथे प्रत्येकी १४ मिमी, तर खडकवासला येथे २ मि.मी. पावसाची नोंद झाली. खडकवासला धरणातून पुणे शहरासाठी ४२२ क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे.

यापूर्वी ७ जुलैपासून पालखी सोहळा आणि जिल्ह्यातील नागरिकांच्या गरजांसाठी मुठा कालव्यात ७०० क्युसेक पाणी सोडण्यात येत होते. लाभक्षेत्रातील हवेली, दौंड आणि इंदापूर तालुक्यांत तीव्र उष्णतेमुळे निर्माण झालेली पाणीटंचाई दूर करण्यासाठी विसर्गात वाढ करण्यात आल्याचे खडकवासला जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी सांगितले.



### ११ जुलैनंतर प्रथमच वाढ

» ११ जुलैपासून ५७ टक्क्यांवर स्थिर असलेला खडकवासला धरण साखळीतील पाणीसाठा अखेर शुक्रवारी ५८.१३ टक्क्यांवर पोहोचला. घाटमाथा आणि पानशेत-मोसे-मुठा खोऱ्यात रिमझिम पाऊस व अधूनमधून उघडीप असल्याने नद्या, ओढे आणि नाल्यांतून धरणांकडे पाण्याची आवक मंदगतीने सुरू आहे.